# “जाणूनबुजून तणाव निर्माण करणारी काँग्रेसची विधाने”



टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवार, ११ मार्च रोजी देशवासियांना आश्वासन दिले की, सरकार आखाती देशांमध्ये अडकलेल्या भारतीयांना सर्वतोपरी मदत करत आहे. यासोबतच त्यांनी युद्धाचे राजकारण करणाऱ्या काँग्रेसवर जोरदार टीका केली. केरळमध्ये निवडणुकीच्या तोंडावर बोलताना पंतप्रधान म्हणाले की, काँग्रेस प्रक्षोभक आणि बेजबाबदार विधाने करत असून यामुळे परदेशात असलेल्या भारतीयांची परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. आखाती देशांमधील भारताचे मिशन आणि दूतावास नागरिकांना चोवीस तास मदत करत आहेत, तसेच या प्रदेशातील मैत्रीपूर्ण सरकारे भारतीयांची काळजी घेत आहेत.

“आखाती प्रदेशातील परिस्थिती पाहता, चिंता स्वाभाविक आहे. आमचे लाखो बंधू आणि भगिनी तिथे काम करतात. पण हे लक्षात ठेवले पाहिजे की भाजप- एनडीए सरकार सत्तेत आहे. जेव्हा जेव्हा आमचे नागरिक दुसऱ्या देशात अडकतात तेव्हा आम्ही त्यांना मदत करण्यासाठी आमची सर्व शक्ती वापरतो. आजचा भारत संकटाच्या वेळी आपल्या नागरिकांना एकटे सोडत नाही. आजही, या संघर्षात अडकलेल्या भारतीयांना सुरक्षितता आणि सर्वतोपरी मदत मिळावी यासाठी आमचे प्रयत्न आहेत,” असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पश्चिम आशियातील सध्याच्या परिस्थितीचा संदर्भ देत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विरोधकांकडून केल्या जाणाऱ्या राजकारणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पंतप्रधान म्हणाले की, काँग्रेस पक्ष इतक्या मोठ्या जागतिक संकटात राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे. काँग्रेस जाणूनबुजून परिस्थिती बिघडवण्यासाठी आणि तेथील आपल्या लोकांना अडचणीत आणण्यासाठी प्रक्षोभक आणि बेजबाबदार विधाने करत आहे. या संकटाच्या काळात काँग्रेस राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत आहे हे मोठे दुर्दैव आहे. पुढे त्यांनी आरोप केला की, पक्ष जाणूनबुजून तणाव वाढवण्यासाठी विधाने करत आहे जेणेकरून भारतीय या परिस्थितीत अडकून राहतील आणि त्यांच्याविरुद्ध राजकीय मोहिमा सुरू करता येतील. मग हे लोक मोदींना शिवीगाळ करणारे रील बनवण्याची मोहीम सुरू करू शकतील, अशी सणसणीत टीका नरेंद्र मोदींनी केली. आत्मनिर्भर भारत निर्माण करण्यासाठी आणि मेक इन इंडिया उपक्रमाला बळकटी देण्यासाठी पेट्रोलियम क्षेत्राचा विस्तार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. कोची रिफायनरी येथे पॉलीप्रोपायलीन युनिटची पायाभरणीही याच उद्देशाने करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. “आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाने आपल्याला पुन्हा एकदा स्वावलंबनाचे महत्त्व शिकवले आहे. कोविड संकट, युक्रेन संकटादरम्यान स्वावलंबी राहणे किती महत्त्वाचे आहे हे आपण पाहिले आहे आणि सध्याच्या संकटाने ते पुन्हा एकदा सिद्ध केले आहे,” असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

आधुनिक पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्याबद्दल भारताचे जागतिक स्तरावर कौतुक होत आहे, असेही पंतप्रधानांनी सांगितले. या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विक्रमी निधीची तरतूद करण्यात आली आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. केंद्राच्या पायाभूत सुविधांच्या विस्ताराच्या प्रयत्नांमुळे केरळला मोठा फायदा होत आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

# न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक

मुख्य संपादक : दिनेश कानजी

मुंबई >> गुरुवार, १२ मार्च २०२६ >> वर्ष ४ >> अंक २७६ >> पाने ४ >> किंमत ५ रुपये

## झटपट डंका

### होर्मुझ सामुद्रधुनीत किती भारतीय जहाजं अडकली?




मध्य पूर्वेतील वाढत्या संघर्षादरम्यान, होर्मुझची सामुद्रधुनी जगातील सर्वात संवेदनशील सागरी मार्गांपैकी एक बनली आहे. जगातील जवळजवळ २०% तेल टँकर येथून जातात, परंतु ड्रोन हल्ले, क्षेपणास्त्र धोके आणि नौदल तणाव आता वाढत आहेत. परिस्थिती इतकी गंभीर आहे की अनेक शिपिंग कंपन्यांनी या मार्गाने जाणे जवळजवळ थांबवले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनी ताब्यात घेण्याची धमकी दिल्यानंतर काही तासांतच इराणने इशारा दिला आहे की जर हल्ले सुरूच राहिले तर ते मध्य पूर्वेतून “एक लिटरही तेल” पाठवू देणार नाही.

>> पान...३ वर

### “सरकारी पक्षाचा खटला ठोस, ग्राह्य पुराव्यांवर आधारित नाही!”



एन्टेलिया बॉम्ब प्रकरणात बडतर्फ पोलिस अधिकारी सचिन वाजे याने स्वतःची सुटका करण्याची मागणी केली आहे. एन्टेलिया बॉम्ब प्रकरण आणि ठाण्यातील व्यावसायिक मनसुख हिरेन यांच्या हत्येच्या प्रकरणात विशेष न्यायालयात सचिन वाजे याने अर्ज दाखल केला आहे. वाजे याचा आरोप आहे की, सरकारी पक्षाचा खटला ठोस आणि ग्राह्य पुराव्यांवर आधारित नसून केवळ आरोपांवर आधारित आहे. वाजे याने एनआयएच्या विशेष न्यायालयात १५० पानांची डिस्चार्ज याचिका दाखल केली.

### घरगुती LPG पुरवठ्याला प्राधान्य



पश्चिम आशियातील वाढत्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात इंधन तुटवड्याच्या चर्चांना उधाण आले असताना केंद्र सरकारने नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की भारतासाठी कच्च्या तेलाचा पुरवठा सुरक्षित आहे आणि घरगुती LPG सिलिंडरचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

#### आवाजी मतदानाने ठराव नाकारला

## ओम बिर्लांना हटविण्याची विरोधकांची योजना फेल

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास ठराव आणणाऱ्या विरोधकांची योजना अखेर अपेक्षेप्रमाणे अपयशी ठरली. बुधवारी विरोधकांनी मांडलेला हा अविश्वास ठराव आवाजी मतदानाने फेटाळण्यात आला. सभागृहात घोषणाबाजी आणि गदारोळाच्या वातावरणात हा ठराव नाकारण्यात आला.

मतदानानंतर लोकसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. सभागृह गुरुवारी सकाळी ११ वाजता पुन्हा सुरू होणार असून त्या वेळी ओम बिर्ला पुन्हा अध्यक्षपदावर बसतील. तसेच



सभागृहातील विरोधकांच्या वर्तनाबाबत ते निवेदन देणार आहेत.

विरोधी पक्षांनी हा प्रस्ताव मांडताना आरोप केला होता की, सभापतींनी सभागृहाचे कामकाज निष्पक्षपणे चालवण्यात अपयश आले आहे. मात्र सरकारने चर्चेदरम्यान हे आरोप ठामपणे फेटाळले.

#### अमित शाह यांचा विरोधकांवर हल्ला

चर्चेला उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली आणि हा प्रस्ताव संसदीय परंपरेसाठी दुर्दैवी असल्याचे म्हटले. शाह म्हणाले, “सभापती हे सभागृहाचे तटस्थ संरक्षक असतात. ते सत्ताधारी आणि विरोधक दोघांचेही प्रतिनिधित्व करतात. अशा पदावर असलेल्या व्यक्तीविरुद्ध हटवण्याचा प्रस्ताव आणणे संसदीय राजकारणासाठी दुर्दैवी आहे.”

त्यांनी सांगितले की, भारताच्या संसदीय इतिहासात लोकसभा सभापतींविरुद्ध अशा प्रकारचे प्रस्ताव अत्यंत दुर्मिळ आहेत आणि जवळपास चार दशकांनंतर असा प्रस्ताव आणला गेला आहे. शाह यांनी हेही नमूद केले की भारतीय जनता पार्टी अनेक वर्षे विरोधी पक्षात असतानाही कधीही सभापतींविरुद्ध अविश्वास ठराव आणला नव्हता.

#### “सभागृह नियमांनुसार चालेल”

पल्या भाषणात अमित शाह म्हणाले की, संसद कोणत्याही पक्षाच्या इच्छेनुसार नाही तर नियमांनुसार चालली पाहिजे. “हे सभागृह एखादा मेळा किंवा उत्सव नाही. येथे प्रत्येकाने नियमांचे पालन करूनच बोलले पाहिजे,” असे ते म्हणाले.

त्यांनी असेही सांगितले की सभापतींच्या प्रामाणिकतेवर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे संसदीय संस्थांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न उपस्थित करणे आहे.

#### विरोधकांचा पक्षपातीपणाचा आरोप

दरम्यान, विरोधी पक्षांनी सभापतींवर पक्षपातीपणाचा आरोप करत संसदेत विरोधी मतांना कमी वाव मिळत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. राष्ट्रीय जनता दलचे खासदार अभय कुमार सिन्हा यांनी सांगितले की काही काळापासून सभापतींची खुर्ची सभागृहाच्या स्वायत्ततेचे प्रतीक राहिलेली नाही.

ते म्हणाले, “या सभागृहाने तो काळही पाहिला जेव्हा एका दिवसात १४० हून अधिक खासदारांना निलंबित करण्यात आले. खरी लोकशाही तीच जिथे सर्वात दुर्बल व्यक्तीलाही आपला आवाज मांडता येतो.”

>> पान...३ वर

## भारतीय कंपनी हिकल राफेल विमानाच्या कंट्रोल सिस्टीमसाठी बनवणार महत्त्वाचे घटक

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



बंगळूरूस्थित भारतीय एरोस्पेस कंपनी हिकल टेक्नोलॉजी (Hical Technologies) सोबत फ्रान्सची अग्रगण्य विमान निर्माता कंपनी डसॉल्ट एविएशनने महत्त्वपूर्ण करार केला आहे. या करारानुसार हिकल टेक्नॉलॉजीज आता राफेल या लढाऊ विमानाच्या फ्लाइट कंट्रोल सिस्टीमसाठी महत्त्वाचे घटक तयार करणार आहे. भारतीय एरोस्पेस उत्पादन क्षेत्रासाठी ही मोठी उपलब्धी मानली जात आहे.

डसॉल्ट राफेल हे जगातील सर्वात आधुनिक मल्टीरोल लढाऊ विमानांपैकी एक मानले जाते. याचे दोन आसनी मॉडेल डसॉल्ट राफेल B हवाई वर्चस्व, जमिनीवरील हल्ले तसेच गुप्तचर मोहिमा अशा विविध प्रकारच्या मिशनसाठी सक्षम आहे. या विमानाच्या कार्यक्षमतेत अत्याधुनिक फ्लाइट कंट्रोल सिस्टीमची महत्त्वाची भूमिका असते. ही प्रणाली कठीण परिस्थितीत आणि प्रचंड ताणाखालीही अचूक कामगिरी सुनिश्चित करते. या करारानुसार हिकल टेक्नॉलॉजीज या प्रणालीशी संबंधित महत्त्वाच्या घटकांचे उत्पादन करेल, जे डसॉल्ट एव्हिएशनच्या कठोर अभियांत्रिकी आणि गुणवत्ता मानकांनुसार तयार केले जातील.

डसॉल्ट एव्हिएशनचे खरेदी आणि पुरवठा विभागाचे वरिष्ठ कार्यकारी उपाध्यक्ष ब्रुनो कॉईफिर यांनी या भागीदारीचे कौतुक करत म्हटले, “हिकल टेक्नॉलॉजीजने गुणवत्ता आणि विश्वासार्हतेबाबत मजबूत बांधिलकी दाखवली आहे- ही मूल्ये डसॉल्ट एव्हिएशनच्या उत्कृष्ट परंपरेशी पूर्णपणे जुळणारी आहेत.”

>> पान...३ वर

## “मोजतबाला सर्वोच्च नेता बनवू नका!” अली खामेनी यांच्या मृत्युपत्रात काय लिहिले आहे?

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

इस्त्रायल- अमेरिकेच्या हल्ल्यात २८ फेब्रुवारी रोजी अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येनंतर मोजतबा खामेनी हे इराणचे नवे सर्वोच्च नेते म्हणून समोर आले. अशातच आता वृत्त समोर आले आहे की, मोजतबा यांना त्यांच्या वडिलांनी म्हणजेच अयातुल्ला खामेनी यांनी कधीही या पदासाठी निवडले नव्हते, इतके की त्यांच्या मृत्युपत्रात त्यांचे नाव नव्हते.

न्यू यॉर्क पोस्टच्या वृत्तानुसार, २८ फेब्रुवारी रोजी हवाई हल्ल्यात मारले गेलेले दिवंगत सर्वोच्च नेते अली खामेनी यांनी त्यांच्या मृत्युपत्रात स्पष्ट केले होते की, त्यांचा मुलगा त्यांच्यानंतर सर्वोच्च पदावर येऊ इच्छित नाही. तथापि, इस्लामिक



रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (IRGC) ने शेवटी मोजतबा यांना या पदावर येण्यासा भाग पाडले. खामेनी यांच्या मृत्युपत्रात, त्यांनी स्पष्टपणे मोजतबा यांचे उत्तराधिकारी म्हणून नाव देऊ नये असे सांगितले होते, असे इराणी गुप्तचर नेटवर्कशी संबंध असलेल्या विरोधी गट नॅशनल युनियन फॉर डेमोक्रसीचे संशोधन संचालक खोसरो इस्फहानी म्हणाले. इस्फहानी पुढे म्हणाले की, मोजतबा हे त्यांच्या वडिलांच्या नावाशिवाय काहीच नाही.

>> पान...३ वर

#### सुरू असलेल्या बांधकामांमुळे जनता त्रस्त

## मागाठाणे स्टेशनबाहेर बिल्डरचे ट्रक, मिक्सर करतायत रुग्णवाहिकांची अडवणूक

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

**बोरिवली पूर्व येथील मागाठाणे मेट्रो रेल्वे स्टेशनच्या बाजूला आणि हायवेलगत असलेल्या मेट्रो मॉलच्या दरम्यान सुरू असलेल्या बांधकामाचा इथल्या पादचाऱ्यांना आणि आसपासच्या कार्यालयातील लोकांना प्रचंड त्रास होऊ लागला आहे. या बांधकाम साईटजवळ उभ्या राहणाऱ्या आणि तिथून ये-जा करणाऱ्या बिल्डरच्या ट्रक, मिक्सरमुळे रहदारीची प्रचंड कोंडी होत आहे.**



विशेष म्हणजे जवळच असलेल्या रुग्णालयातील रुग्णवाहिकांनाही या सगळ्या रहदारीमुळे मनस्ताप सहन करावा लागतो. त्याबद्दलही लोक संताप व्यक्त करत आहेत.

या बांधकामाच्या साईटवरून अनेक मोठमोठे ट्रक्स, मिक्सर या परिसरात चालत असतात. त्यामुळे या भागात रहदारीची प्रचंड कोंडी होत असून त्याचा त्रास लोकांना होत आहे. हे ट्रक, मिक्सर बांधकामाच्या ठिकाणाहून बाहेर येताना किंवा आत जाताना या गाड्या छोट्या रस्त्यावरून वळवल्या जातात त्यामुळे तिथे ही रहदारीची कोंडी होते.

मागाठाणे मेट्रो स्टेशन आणि मेट्रो मॉल यादरम्यान असलेल्या रस्त्यावर दोन्ही बाजूंनी हे मोठमोठे ट्रक्स आणि मिक्सर पार्क केल्यामुळे या रस्त्यावर अन्य गाड्या चालवणेही मुश्कील होत असल्यामुळे लोकांचा संताप होत आहे.

यासंदर्भात वारंवार तक्रारीही लोकांनी केलेल्या आहेत. विशेष म्हणजे याच परिसरात असलेल्या अपेक्स हॉस्पिटलच्या रुग्णवाहिकाही याच रस्त्याने जात असतात पण दोन्ही बाजूंनी पार्क असलेल्या या महाकाय गाड्यांमुळे रुग्णवाहिकांनाही कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत असल्याच्या घटना घडल्या आहेत.

ही सगळी परिस्थिती लक्षात घेता वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद तावडे यांनी याची दखल घेत सदर गाड्यांवर दंडात्मक कारवाई केली तसेच बांधकामाच्या ठिकाणी असलेल्या संबंधितांना समजही दिली.

आता त्याठिकाणी गाड्या कुठे वळवता येणार नाहीत हे दर्शवणारा बोर्ड लावण्यात आला आहे. ट्रॅफिक पोलिसांनी याची दखल घेत या महाकाय गाड्यांवर कारवाई केली आहे.

पण कारवाई झाल्यानंतर काही काळ परिस्थिती निवळते मात्र नंतर पुन्हा एकदा या मोठमोठ्या गाड्या तिथे उभ्या असतात. त्यामुळे गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागतात आणि त्याचा त्रास प्रवाशांनाही होतो. या बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारांना यासंदर्भात समज देण्यात यावी आणि हे ट्रक्स, मालवाहतूक करणाऱ्या भल्यामोठ्या गाड्या, मिक्सर यांच्याकडून रहदारीची कोंडी झाली तर त्यावर कारवाई करण्यात येऊन त्यांच्यावर जरब बसवावी अशी लोकांची मागणी आहे.